सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे ( आपत्ती व्यवस्थापन शाखा )

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-mail- homebranchpune@gmail.com

वाचा:- १.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१.
३. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

---

जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
क्र.जि.आ.व्य/कावि/१७०/२०२० .
पुणे, दिनांक २४/३/२०२०

प्रति,

अध्यक्ष, जिल्हा पेट्रोल/डिझेल पंप असोसिएशन,
जिल्हा पुणे

**विषय :-** कोरोना या विषाणू संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने पेट्रोल/डिझेल विक्री करणेस मनाई करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविणेत येते कि, सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशाअंतर्गत कोरोना या विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवाशी भारतात या विषाणूचा सर्वत्र प्रवास करित आहेत. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती पुणे जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १९८७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणूचा ( कोव्हीड - १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी येणा-या दुचाकी/तीनचाकी/चारचाकी वाहनांमध्ये पेट्रोल भरणा करणेस मनाई करणेत येत आहे. तथापि,

१. अत्यावश्यक सेवेवर कार्यरत असणारे सर्व अधिकारी/कर्मचारी
२. कोरोना नियंत्रण व निर्मुलनासाठी कार्य करणा-या खाजगी व्यक्ती.
३. अत्यावश्यक वस्तू व सेवा संदर्भात कार्य करणारी खाजगी व्यक्ती.
४. वैद्यकिय उपचार किंवा सहाय्याची गरज असणारी व्यक्ती.

वरीलप्रमाणे ०१ ते ०४ बाबींना यांना यातून सुट देणेत येत आहे. तथापी, सदर सूट देणेत येणा-या व्यक्तीने एकदाच टाकी पूर्ण भरून घेणे बंधनकारक आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे यांनी जिल्ह्यामधील वर नमूद ०१ ते ०४ व इतर आवश्यक असणा-या अधिकारी/कर्मचारी व खाजगी व्यक्ती यांचे वाहनांना पेट्रोल/डिझेल उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व विभागाकडून यादी संकलित करून त्याची शहानिशा करून त्याप्रमाणे पेट्रोल/डिझेल पंपधारकांना पेट्रोल/डिझेल भरणा करणेसाठी तात्काळ उपलब्ध करून देणेत यावी.

( नवल किशोर राम )
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रत :-** १. पोलिस अधिक्षक पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी रवाना.
२. अन्नधान्य वितरण अधिकारी,/जिल्हा पुरवठा अधिकारी पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner